# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

**मा. विशेष सभा**

**मा.विशेष सभा सूचना क्र. ०७**

**दि.२४/०४/२०२६**

प्रति,
मा.श्री /श्रीमती ......................................................................................,
नगरसेवक / नगरसेविका,
वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेची मा.विशेष सभा गुरुवार, दि.३०/०४/२०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता 'सर्वसाधारण सभागृह', ४ था मजला, वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे खालील विषयांवर निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यांत आली आहे.

तरी सदर विशेष सभेस कृपया उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा.विशेष सभेची विषय पत्रिका**

१. श्री.राजेश विष्णू भाटे, सफाई कामगार यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.
२. श्रीमती वर्षा दिपक सोलंकी यांना लाड समिती शिफारसीनुसार महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावून घेणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.
३. श्री.राहूल रमेश कवळे यांना लाड समिती शिफारसीनुसार महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावून घेणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.
४. प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील गाव-मौजे बोळींज येथील सर्व्हे नं.१६५/वी/७ या उद्यानाकरीता आरक्षित असलेल्या भुखंडावर उद्यानाचा विकास व देखभाल करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.
५. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात महानगरपालिकेची रुग्णालये व माता बाल संगोपन केंद्रांसाठी वैद्यकीय अधिकारी स्त्रीरोग तज्ञ (पूर्णवेळ), बधिरीकरण तज्ञ (पूर्णवेळ), रेडिओलॉजीस्ट (पूर्णवेळ), चेष्ट स्पेशालिस्ट (पूर्णवेळ) संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी स्वरुपात करारपध्दतीने ६ महिन्याच्या कालावधीसाठी मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात पदभरती करणेकरीता वृत्तपत्रात तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस व सदरकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.
६. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई गाव येथील मौजे मालोंडे स.नं. ७७अ मधील दफनभुमी जागेत विविध आवश्यक कामे करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.
७. वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व मालमत्तांना नळजोडण्या देऊन पाण्याचा लाभ उपलब्ध करून देण्याचा धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.
८. सन २०२६-२७ या वित्तीय वर्षामध्ये महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याकरिता निधी थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे देण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

९. बायो-मायनिंग व प्रक्रिया कामासाठी 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार' म्हणून मे.ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांची नियुक्ती करण्यास व येणाऱ्या खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

१०. वसई-विरार शहर महानगरपालिकेस कचरामुक्त शहर (GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) करणेकरिता मा.सर्वसाधारण सभेपुढे प्राथमिक प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

११. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ओसी/सीसी नसलेल्या इमारतीमध्ये उभारण्यात आलेल्या रुग्णालयांबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

१२. वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) मध्ये नाना नानी पार्क ते आकांशा कॉम्प्लेक्स फेस-२ पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा आर.सी.सी. गटार बांधणे तसेच रस्त्याची उंची वाढवून खडीकरण व डांबरीकरण करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

१३. वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा स्टेशन रस्त्यालगत गोकुळ अपा. ते के.एम.अपा. पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

१४. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३३ व अन्वये विरार येथील हायस्पीड रेल्वे स्थानक क्षेत्रात स्थानिक क्षेत्र योजना (Local Area Plan) तयार करणेकामी इरादा प्रसिध्द करण्याबाबत. (दि.२३/०४/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेतील स्थगित विषय)

आपला विशासू,

**सही/-**

(विश्वनाथ तळेकर)

महानगरपालिका सचिव

वसई-विरार शहर महानगरपालिका

(मा.महापौर महोदय यांच्या मान्यतेने)